भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ८२७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/१२/२०१७

**१) मोटार सायकल स्लीप होवुन डोक्याला मार लागुन इसमाचा मृत्यु . :–**

दिनांक २४/१२/२०१७ चे १६.३५ वाजता दरम्यान यातील आरोपी मृतक मनोहर सुखदेवजी निनावे वय ६५ वर्ष, रा. चांदोरी(मुंडीकोटा) याने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही भरधाव वेगाने निष्कळजीपणे चालवुन मोटार सायकल ही स्लीप होवुन गाडी सह रोडवर पडल्याने त्याचे डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने त्यास औषधोपचारा सु. बो. दवाखाना तुमसर येथे नेले असता तेथील डॉक्टरनी तपासुन मृत घोषीत केल्याने फिर्यादी राजकुमार छगन येरपुडे वय ४१ वर्ष, रा. मांढळ यांचे (देव्हाडी) यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खैरकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) घरातील सोन्याचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी. . :–**

दिनांक २४/१२/२०१७ चे १२.१५ वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचे घराचे समोरील टेकुन असलेला दार उघडुन घरात प्रवेश करुन घरातील आलमारीत गोल स्टीलच्या डब्यात ठेवलेला मंगळसुत्र ज्यात ८० सोन्याचे मनी वजन १० ग्रॅम, व सोन्याचा पदक ३ ग्रॅम असा एकुण १३ ग्रॅम, व नगदी ३,४००/–रु. २ मतदान कार्ड, पोस्टाची पास बुक असा एकुण ४२,४००/–रु. चा माल स्टील डब्यासहीत चोरुन नेल्याने फिर्यादी सौ. निशा हेमराज नंदनवार वय ३४ वर्ष, रा. सुभाष वार्ड मोहाडी यांचे तोंडी व रिपोर्ट पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४५४,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेपुंजे पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**३) अल्पवयीन दोन मुलांना फुस लावुन पळवुन नेल्याने गुन्हा नोंद . . :–**

दिनांक २२/१२/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीचा अल्पवयीन मुलगा व त्याचा मित्र हे घरी कोणाला काही न सांगता घरुन निघुन गेले आहेत त्यांचा शोध घेतला असता मिळुन आले नाही. कोणीतरी अज्ञात ईसमाने फिर्यादीचा मुलगा व त्याचा मित्र यांना फुस लावुन पळवुन नेले असावे असे फिर्यादी यांचे तोंडी व रिपोर्ट पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. खैरकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २४/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ५६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती– ०१ केसेस व ईतर वाहनांवरती –५५ केसेस करण्यात आलेले आहे.

25.12

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म. रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.